जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७८४ दिनांक - ०४/११/२०२३**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## स्वप्नील ऊर्फ बिट्या संजय कुचेकर (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०७ साथीदार यांचेविरुध्द मकोका कारवाई

यातील फिर्यादी वय ५० वर्षे रा.मांजरी ब्रु पुणे हे दि.२४/०९/२०२३ रोजी त्यांचे राहते घरासमोर रात्री ०९/०० वा.चे.दरम्यान मांजराई मंदीरा समोरील रस्त्यावर संजय पवार यांचे लॉन्ड्री समोर मांजरी पुणे.येथे गणेश मंडळाची विसर्जण मिरवणुक आली असताना,स्पिकरचा आवाज फिर्यादी यांनी कमी करण्यास सांगितल्याचे कारणावरुन स्वप्नील ऊर्फ बिट्या संजय कुचेकर व त्याचे इतर ०७ साथीदार यांनी यातील फिर्यादी यांना लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने मारहाण केली तसेच यातील **टोळी प्रमुख आरोपी नामे स्वप्नील बिठया ऊर्फ स्वप्नील कुचेकर** यांने फिर्यादी यांचे डोक्यात लोखंडी रॉडने जीवे ठार मारण्याचे उद्देशाने मारहाण करुन जखमी केले तसेच त्याचे इतर आरोपीत यांनी त्यास पकडुन ठेवुन हाताने तसेच लाथा-बुक्क्यांनी मारहाण करुन आपले हातातील लोखंडी रॉड व लाकडी दांडके हवेत जोरजोरात फिरवुन मोठ-मोठयाने धमक्या देऊन परीसरात दहशत माजवली म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरून हडपसर पो.स्टे.गु.र.नं.**१४५५/२०२३ भा.द.वि.कलम ३०७,३२४,३२३,५०४,५०६,१४१,१४६,१४७,१४८,१४९,क्रिमिनल लॉ अमेंडमेट ॲक्ट कलम ७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयाच्या तपासा दरम्यान यातील निष्पन्न आरोपी नामे **१) स्वप्नील ऊर्फ बिट्या संजय कुचेकर वय २३ वर्षे रा.मांजराई मंदीरा शेजारी मांजराईनगर मांजरी बु// ता.हवेली जि.पुणे (टोळी प्रमुख) २) पंकज गोरख वाघमारे वय २८ वर्षे रा.बंटर शाळेजवळ गाडीतळ हडपसर पुणे.(टोळी सदस्य) (३)हर्षल सुरेश घुले वय २३ वर्षे रा.शिवाजी पुतळया शेजारी मांजरी बु// ता.हवेली जि.पुणे (टोळी सदस्य) यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असुन ०३ विधीसंघर्षीत बालक यांना ताब्यात घेण्यात आले आहे व यातील दोन पाहिजे आरोपी यांचा शोध सुरू आहे.**

वरील आरोपींचे पुर्व रेकार्ड ची पाहणी करता आरोपी **१) स्वप्नील ऊर्फ बिट्या संजय कुचेकर (टोळी प्रमुख)** व त्याचे साथीदारासह गुन्हेगारी टोळी तयार केली असून ते सर्व हडपसर,मांजरी, शेवाळवाडी लोणी टोल नाका या भागात त्यांचे टोळीचे वर्चस्व वाढविण्यासाठी तसेच इतर साथीदारांसह शरीराविरूध्दचे गुन्हे त्यामध्ये घातक शस्त्र बाळगुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे,घातक शस्त्र बाळगुन दरोडा टाकणे,जबरी चोरी करणे,नागरीकांमध्ये दहशत निर्माण करणे,येणारे जाणारे लोकांना कोयते दाखवुन त्यांना दारु पिण्यासाठी दमदाटी करुन पैसे मागणे. छोटे व्यवसायिक व दुकानदार तसेच पथारीवाले यांना दमदाटी करुन त्यांचे मनामध्ये दहशत निर्माण करुन त्यांचेकडुन फुकट वस्तु घेऊन जाणे इतर असे गंभीर गुन्हे वारंवार करत असतात. त्यांचे दहशतीमुळे त्यांचे विरुध्द कोणीही तक्रार देण्यास पुढे येत नाही.तसेच त्याचे विरुध्द पुणे शहरातील वेगवेगळया पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असलेची माहिती मिळुन आली. त्याने त्याचे टोळीतील सदस्यांनी पुणे शहर हडपसर परिसरात मोठया प्रमाणात दहशत निर्माण केली आहे.यातील नमुद सदस्यांवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करुन देखील त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

दाखल गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२),३(४) चा अंतर्भाव करणे कामी वरीष्ठ पोलिस निरीक्षक हडपसर पो.स्टेशन पुणे श्री.रविंद शेळके यांनी पोलिस उपायुक्त परिमंडळ ०५ श्री.विक्रांत देशमुख, यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१४५५/२०२३ भा.द.वि.कलम ३०७, ३२४,३२३,५०४,५०६,१४१,१४६,१४७,१४८,१४९,क्रिमिनल लॉ अमेंडमेट ॲक्ट कलम ७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयांमध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४)चा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढिल तपास मा.सहा,पोलिस आयुक्त हडपसर विभाग पुणे शहर श्रीमती अश्वीनी राख हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उप-आयुक्त परीमंडळ ५ पुणे शहर,श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे शहर, श्रीमती अश्विनी राख, यांचे मार्गर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर,श्री.रविंद शेळके,पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री.विश्वास डगळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री संदिप शिवले म.सहा.पोलीस निरीक्षक सारिका जगताप, सहा.पोलीस निरीक्षक सचिन दाभाडे, निगराणी पथकातील पोलीस अंमलदार प्रविण शिंदे,गिरीश एकोर्गे,महेश उबाळे,राजश्री खैरे वसीम शेख,बाबा शिंदे,अशोक आंधारे सर्व हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर यांनी कारवाई केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्वीकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारीक लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली सन-२०२३ या चालु वर्षातील एकुण ७७ वी कारवाई आहे.**